नियमित दरखास्त क्र. ०१/२०१८
गोरोबा वि. मारुती

**आदेश नि.क्र. २७ वर**

(CNR No. MHLA050000022018)

ऋणको क्र.१ व २ यांनी कागदपत्रे दाखल करण्याची परवानगी मिळण्यासाठी हा अर्ज केला आहे.

२. या अर्जावर धनकोने म्हणणे देऊन अर्जास तीव्र आक्षेप घेऊन अर्ज नामंजूर करण्याची मागणी केली आहे.

३. दोंन्ही बाजुच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकला. ऋणकोच्या वकिलांचे म्हणणे असे की, नियमित दिवाणी अपील क्र. ४/२०२१ मधील नि.क्र.१ ची सत्यप्रत दाखल करीत आहे. प्रस्तुतच्या प्रकरणाशी संबंधीत ते कागदपत्रे आहेत. त्यामुळे ते दाखल करुन घेण्यास परवानगी मिळावी. धनकोच्या वकिलाचे म्हणणे असे की, सदर कागदपत्र या प्रकरणाशी आजीबात संबंधीत नाही. त्यामुळे हे दाखल करण्यात येऊ नयेत.

४. प्रस्तुतची कागदपत्रे हे नियमित दिवाणी अपील क्र.४/२०२१ मधील नि.क्र.१ ची सत्यप्रत आहे. दाखल होणारे कागदपत्रे प्रस्तुत प्रकरणाशी संबंधीत आहे की नाही हे या प्रकरणाच्या सुनावणीवेळी दिसून येणार आहे. परंतु या घडीला ते संबंधीत नाही या कारणावरुन दाखल करण्यास विरोध करणे न्यायोचित होणार नाही. संबंधीत पक्षकारास कागदपत्रे दाखल करण्यास परवानगी देणे उचित होणाार आहे. म्हणून हा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून मी खालील आदेश देतो.

**आदेश**

कागदपत्रे या प्रकरणी दाखल करुन घेतली आहेत.

**(प्र. अ. सवदीकर)**

दि.२७/०८/२०२१.

दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
अहमदपूर.